# सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

## सेवा करार पध्दतीने मालमत्ता नोंदणी अधिकारी पदाची नियुक्ती करण्याबाबत.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडील मालमत्ता विभागाकडे एक वर्ष कालावधीसाठी महसुल विभागातील सेवानिवृत्त तहसिलदार / नायब तहसिलदार यांना सेवा करार पध्दतीने "मालमत्ता नोंदणी अधिकारी" या विवक्षित कामाच्या पदासाठी इच्छुक उमेदवारांकडुन दिनांक २३/०७/२०२१ पर्यत कार्यालयीन वेळेत अर्ज मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदांचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १. | मालमत्ता नोंदणी अधिकारी | पदसंख्या - १ . |
| २. | कामाचा तपशिल | महापालिका मालकीचे खुले भुखंड, अतिरिक्त जमीनी, महापालिकेच्या मालकीच्या जागा, मालमत्ता यांचा शोध घेऊन महापालिकाच्या मालकीचे सदरी नोंदणी करणे. |
| ३. | मानधन | सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकुण वेतनातुन (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रककम त्यांचे मासिक पारिश्रमीक म्हणुन निश्चित करण्यात येईल. (मात्र ४०,०००/- पेक्षा जास्त नाही.) |

अटी -

१. उमेदवारांने अर्जासोबत स्वतःचे अलिकडच्या काळातील फोटोसह अर्ज, अर्हता अनुभव, शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या आदेशाची प्रत, आधार कार्ड ओळखपत्र, जन्म तारखेचा दाखला इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज **मा.आयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचे नांवे प्रशासन अधिकारी (आस्था), कामगार कार्यालय, शाळा नंबर १ च्या समोरील इमारत पहिला मजला, सांगली. येथे दिनांक २३/०७/२०२१ रोजी अखेर सादर करण्याचा आहे.** मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२. प्राप्त अर्जाची छाननी अंती मुलाखतीची तारीख पात्र उमेदवारांना कळविण्यात येईल. उमेदवारांनी अर्जामध्ये सद्याचा राहण्याचा पत्ता व मोबाईल नंबर न चुकता नमुद करावा.

३. सदर सेवा करार पध्दतीने केलेली नियुक्ती हि निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील असुन या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापने वरील सेवेशी कोणताही संबंध नाही. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. अथवा कायदेशिर दाद मागता येणार नाही.

४. निवड होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती अटी नुसार विवित नमुन्यात रुपये.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

५. सदर जाहिरातीच्या नियुक्त्या,पदसंख्या, शर्ती अटी यामध्ये बदल कमी अधिक मजकुर इ.बदल वा प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांच्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

क्र.मनपा /आस्थावि/०१/ ७०६ /२०२१-२०२२
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका.
दिनांक - १४ /०७/२०२१.

(नितीन कापडणीस)
आयुक्त.
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका.